॥ पढमं णाणं तओ दया ॥
Shri Tilok Jain Dnyan Prasarak Mandal's
SHRI ANAND COLLEGE
Pathardi, Tal. Pathardi, Dist. Ahmednagar - 414 102
**Ph.** (02428) 222736,
**email :** anand.shristjvp@gmail.com **Web:** http://shrianandcollege.com
STJDPM
JAI ANAND

**National Service Scheme**
**Seed Sowing Activity**
**Date: 12/07/2023**

On the 12th of July 2023, as part of the National Service Scheme at Sri Anand College Pathardi, and in collaboration with the Sri Anandvan Tree Plantation and Conservation initiative, a seed sowing activity was conducted. Various types of seeds were collected and planted on GarbhagiriMountain.

Prof. Dr. JagannathBarashile, Prof. SuryakantKalokhe, and Dr. Ismail Shaikh NSS Programme officer provided guidance to the students during the seed planting process. The seeds of lemon, tamarind, karanj, and bahava were predominantly planted during the activity.

A significant number of volunteers and students from the National Service Scheme actively participated in this meaningful initiative, contributing to the conservation and enhancement of the natural environment.


MH SH 68, Maharashtra 414102, India
Latitude 19.113760N Longitude 75.145600E
LOCAL 13:12:20 GMT 07:42:20 TUESDAY 11.07.2023 ALTITUDE 0 METER


MH SH 68, Maharashtra 414102, India
Latitude 19.108780N Longitude 75.142316E
LOCAL 13:14:29 GMT 07:44:29 TUESDAY 11.07.2023 ALTITUDE 0 METER


MH SH 157, Chekewadi, Maharashtra 414102, India
Latitude 19.104948N Longitude 75.139762E
LOCAL 13:14:13 GMT 07:44:13 TUESDAY 11.07.2023 ALTITUDE 0 METER


MH SH 68, Maharashtra 414102, India
Latitude 19.113760N Longitude 75.145600E
LOCAL 13:12:20 GMT 07:42:20 TUESDAY 11.07.2023 ALTITUDE 0 METER


MH SH 68, Maharashtra 414102, India
Latitude 19.108780N Longitude 75.142316E
LOCAL 12:16:52 GMT 06:46:52 TUESDAY 11.07.2023 ALTITUDE 0 METER

दिव्यलोकप्रभाप्रतिनिधी राजेंद्र चव्हाण

# गर्भगिरीच्या डोंगरावर दीड हजार वृक्षांची लागवड

## तिलोक जैन परिवाराने अहमदनगर जिल्ह्यापुढे निर्माण केला आदर्श

पाथर्डी (प्रतिनिधी): पाथर्डी तालुक्यातील माणिकदौंडी घाटात गर्भगिरीच्या डोंगरावर श्री तिलोक जैन परिवाराने एका तासात सुमारे अकराशे पन्नास झाडांची लागवड करत अहमदनगर जिल्ह्यापुढे वृक्षारोपणात एक आदर्श निर्माण केला आहे. या लागवडी दरम्यान 'झाडे लावू गड्यांनो, झाडे लावू' या गाण्यावर विद्यार्थ्यांनी झाडे लावून नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण करण्यात आली.

माणिकदौंडी घाटातील गर्भगिरीच्या डोंगरावर श्री तिलोक जैन परिवाराने एका तासात ११५० झाडे लावून आपला वेगळा ठसा उमटवला .झाडे लावण्याच्या या मोहिमेमध्ये सुमारे ३०० महाविद्यालयीन तसेच कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थी ,११० शिक्षक व संस्थाचालक सहभागी झाले होते.'झाडे लावू गड्यांनो, चला झाडे लावू' या गाण्यावर विद्यार्थ्यांनी झाडे लावली. रविवारी पाथर्डी शहरातून श्री आनंद महाविद्यालय ,श्री तिलोक जैन विद्यालय तसेच श्री आनंद कॉलेज ऑफ फार्मसी मधील सुमारे ३०० विद्यार्थी माणिकदौंडी येथील गर्भगिरीच्या डोंगरावर पोहोचली.त्या ठिकाणी आमदार मोनिका राजळे यांचे हस्ते या मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. या वेळी माजी समाजकल्याण सभापती अर्जुनराव शिरसाट, माजी पंचायत समिती सदस्य सुनील ओव्हळ, माजी नगराध्यक्ष अभयराव आव्हाड, तिलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळाचे खजिनदार सुरेश कुचेरिया, विश्वस्त धरमचंद गुगळे, डॉ.सचिन गांधी, चांदमल देसरडा, विजय लुणावत, माजी सभापती काकासाहेब शिंदे, शिवाजीराव मोहिते, धनगरवाडीचे सरपंच मिठू चितळे, अशोक गाडे आदींसह परिसरातील नागरिक उपस्थित होते. झाडे लावण्यासाठी पाच विद्यार्थी व एक शिक्षक असे सुमारे ५० ग्रुप करण्यात आले होते. प्रत्येक ग्रुपने किमान २५ झाडे लावावेत, असे नियोजन करण्यात आले होते. त्या नुसार सुमारे ३०० विद्यार्थ्यांनी एका तासात ११५० झाडे लावली. झाडे लावल्यानंतर खड्ड्यात माती टाकून त्यावर पाणी टाकण्यात आले.'झाडे लावू गड्यांनो, चला झाडे लावू' या गाण्यावर विद्यार्थ्यांनी मनसोक्त आनंद घेत झाडे लावली. त्या नंतर विद्यार्थ्यांनी त्याच ठिकाणी वनभोजनाचा आस्वाद घेतला. यावेळी बोलतांना आमदार मोनिका राजळे म्हणाल्या ,शैक्षणिक क्षेत्राबरोबर सामाजिक उपक्रमात श्री तिलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळ ही संस्था कायम अग्रेसर असते. या पूर्वी सुद्धा कोरोना काळात या संस्थेने मोठे काम केले होते.आज वृक्ष लागवडीचा त्यांनी घेतलेला उपक्रम स्तुत्य असा आहे.संस्था जे काही सामाजिक उपक्रम राबवीत आहेत, त्या उपक्रमात आम्हालाही सहभागी करून घ्या. जी जी मदत लागेल, ती आमच्याकडून दिली जाईल, अशी ग्वाही राजळे यांनी या वेळी दिली.या वेळी अर्जुनराव शिरसाट यांनीहि या उपक्रमाचे कौतुक करत समाजउपयोगी कामे करणाऱ्या बरोबर आम्ही कायम स्वकरी राहू असेही ते म्हणाले. प्रास्ताविक संस्थेचे सचिव सतीश गुगळे, सूत्रसंचालन डॉ मुक्तार शेख स्वागत डॉ. इस्माईल शेख तर आभार प्रा सुर्यकांत काळोखे यांनी मानले. कार्यक्रमास प्राचार्य डॉ. शेषराव पवार, प्राचार्य विलास भगत,माणिकदौंडीचे मुख्याध्यापक राजाराम माळी,उपमुख्याध्यापक विजय छाजेड, दिलावर फकीर, विजय घोडके आदि उपस्थित होते. वनस्पती शास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. जगन्नाथ बर्शिले यांनी झाडे लावण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

